# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक १०४/२०२०** **दिनांक २९/१२/२०२०** **कालावधी ५ दिवस**

| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २३/१२/२०२० ते २९/१२/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ३०/१२/२०२० सकाळी ८:३० पासून ०३/०१/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| २३/१२ | २४/१२ | २५/१२ | २६/१२ | २७/१२ | २८/१२ | २९/१२ | | ३०/१२ | ३१/१२ | ०१/०१ | ०२/०१ | ०३/०१ |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | २९ | ३० | ३१ | ३२ | ३१ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | १९ | १९ | २० | २० | २० |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५८ | ५७ | ५७ | ६६ | ५९ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३३ | २८ | ३२ | ३८ | ३५ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ५ | ७ | ६ | ५ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | ई.पू. | पू. | पू. | पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ३०९०.६ | ५१९७.२ |

## हवामान सारांश /ईशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्ह्यात दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पासून ते ३ जानेवारी, २०२१ दरम्यान किमान तापमानात टप्या टप्याने वाढ संभवत असून आकाश निरभ्र राहील. |

## हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | रोपवाटिका | • भात रोपवाटिकेला नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• भात पुर्नलागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये पहिली नांगरणी करावी आणि नांगरणीच्या वेळेस चांगले कुजलेले शेणखत एकरी ३ टन जमिनीत मिसळावे तसेच बांधांची बांधबंधीस्ती करावी |
| **हरभरा** | वाढीची अवस्था | • हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून या किडीच्या अळ्यामुळे पानांवर पांढरे डाग दिसून येतात आणि शेंडे खाल्ल्यासारखे दिसतात. किडीच्या नियंत्रणासाठी शेतात एकरी दोन कामगंध सापळे लावावेत तसेच एकरी दोन पक्षी थांबे लावावेत. किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अझाडीराक्टीन ३०० पीपीएम ५ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **आंबा** | पालवी ते बोंगे अवस्था | • **बोंगे फुटण्याच्या अवस्थेत** असलेल्या आंब्यावर तुडतुड्यांचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. + हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी घेतली असल्यास पुन्हा फवारणी घेवू नये.<br>• शिफारशीत दिलेली कीटकनाशकाची/बुरशीनाशकाची मात्रा ही मनुष्यबळाने वापरण्यात येणाऱ्या |

| | | |
|---|---|---|
| | | पंपासाठी आहे.<br>• निरभ्र आकाश व बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. पहिल्या वर्षी आठवडयातून एकदा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून एकदा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून एकदा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी द्यावे. |
| **काजू** | मोहोर ते फळधारणा | • **मोहोर अवस्थेत** असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडींच्या वाढीसाठी हवामान अनुकूल दिसत असल्याने या किडींच्या बंदोबस्तासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• **फळधारणा** झालेल्या काजूच्या फळांवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत).<br>• **<u>टीप:</u>** ढेकण्या किड सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेस सक्रीय असल्याने किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फवारणी शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा सायंकाळी ४.०० वाजल्यानंतर करावी. फवारणी घेतली असल्यास पुन्हा फवारणी घेवू नये.<br>• काजू बियांचे उत्पादन व बियांचे आकारमान वाढविण्यासाठी प्रति झाड ताज्या किंवा आठ दिवसापर्यंत साठविलेल्या २५ टक्के गोमुत्राच्या ५ लिटर द्रावणाची फवारणी आणि २५ टक्के गोमुत्राच्या १० लिटर द्रावणाची झाडाच्या बुंध्यामध्ये जिरवणी करावी.<br>• निरभ्र आकाश व बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पंधरा दिवसाच्या अंतराने १५ लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. |
| **नारळ** | फळधारणा | • नवीन लागवड केलेल्या नारळ बागेत तीन ते चार वर्षे वयापर्यंतच्या माडाना ६ ते ७ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच पूर्ण वाढलेल्या माडांना जमिनीच्या मगदुराप्रमाणे ५ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| **सुपारी** | फळधारणा | • सुपारीची काढणी घडाची संपूर्ण फळे नारंगी रंगाची झाल्यावर काढणी करावी. काढणी केलेल्या फळांवरील सालीचे पट्टे काढावेत आणि फळे उन्हात ४० ते ४५ दिवस वाळवावेत.<br>• सुपारीच्या ३ वर्षावरील प्रत्येक झाडास डिसेंबर ते जानेवारी महिन्यात १६० ग्रॅम युरिया आणि १२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश असा खताचा दुसरा हप्ता झाडाच्या बुंध्या पासून १ मीटर अंतरावर बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. वर दिलेली खताची मात्रा तीन वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/३ पट आणि दुसऱ्या वर्षी २/३ पट या प्रमाणे देण्यात यावी.<br>• बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने सुपारी बागेस ६ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **मिरची** | फुलधारणा | • मिरची पिकावर फुलकिडे, कोळी व पांढरी माशी ई रसशोषक किडीमुळे  चुरडा मुरडा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडी पानातील रस शोषून घेतल्याने मिरचीची पाने सुरकुतून त्यांची वाढ खुंटते. यासाठी गोमुत्र १० टक्के आणि अझाडीराक्टीन १०००० पी.पी.एम. ३ मि.ली. प्रति लिटर पाण्यातून आलटून पालटून सात दिवसांच्या अंतराने फवारणी कराव्यात.<br>• मिरची पिकास ४ ते ५ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• मिरची पिकाला फुले धरण्याच्या वेळी नत्र खताची दुसरी मात्रा ३ ग्रॅम युरिया प्रती रोप या प्रमाणे खताची मात्रा द्यावी. |
| **कलिंगड** | वाढीची अवस्था | • कलिंगड पिकास ४ ते ५ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील | | |

तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.
अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.